मा. कोर्ट प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जालना  **P.S.(ठाणे):** कदीम -जालना
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0035  **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/02/2025 00:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 03/02/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/02/2025
**Time From (वेळेपासून):** 18:02 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 04/02/2025  **Time (वेळ):** 00:36 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/02/2025 00:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 02 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभा,जालना कार्यालयाच्या आवारात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** धर्मा मदनराव मोटारकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घेटोळी ताजिजालना,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घेटोळी ताजिजालना,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9511484111

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल रमेश यन्नावार | | | 1. पोचमा माता मंदीर, इतवारा बाजार,कासारी यांच्या घरी किरायाने, ब,कदीम -जालना, जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

माझ्या शर्टाच्या आतुन गळ्यात अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 नागरे यांचे सोबत वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना भेटण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही माझ्या कडील मोटार सायकलने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे जावुन वरिष्ठ लिपिक यन्नावार यांची भेट घेऊन कामा बाबत चर्चा केली. त्यानंतर मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही वरिष्ठ लिपिक यन्नावार यांच्या सोबत कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण यांच्या कक्षात गेलो. सदर कक्षात माझ्या कामा बाबत बरीच चर्चा झाली. चर्चे दरम्यान कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण यांनी माझे एक बील मंजुर केले असुन एक बील मंजुरीसाठी सर्कल ऑफीसला पाठविल्याचे सांगितले तसेच एक बील एक दोन दिवसात काढुन देतो असे सांगितले. त्यानंतर कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण यांच्या कक्षात माझ्या कामा संबंधी बरीच चर्चा झाली. त्यानंतर थोडया वेळाने मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही तेथुन निघुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर मशीन पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केली. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी ऐकले. त्यामध्ये वरिष्ठ लिपिक यन्नावार व कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण यांनी तीन बीलापैकी एक बील मंजुर करुन एक बील मंजुरी करीता सर्कल ऑफीसला पाठवल्याचे सांगुन एक बील एक दोन दिवसात काढुन देतो असे निष्पन्न झाले.
त्यानंतर लगेच माझा मोबाईल क्रमांक 9511484111 यावर वरिष्ठ लिपिक यन्नावार यांचा मोबाईल क्रमांक 8237420394 यावरुन कॉल आला. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांच्या सूचना वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु केली. त्यावेळी मी माझ्या मोबाईलचा आवाज स्पिकरवर टाकुन बोललो असता मला वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी पुन्हा भेटण्यास बोलावुन कॉल कट केला असता पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन बंद केली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळ्यात अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 नागरे यांचे सोबत पुन्हा वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना भेटण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही माझ्या कडील मोटार सायकलने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे जावुन वरिष्ठ लिपिक यन्नावार यांची भेट घेतली. त्याठिकाणी आमची कामा संबधी बरीच चर्चा झाली. त्यावेळी वरिष्ठ लिपिक यन्नावार हे त्याच काय ते मी बोलतो साहेबाला असे म्हणाले असता मी हम्म असे म्हणालो. त्यावर यन्नावार बोलतो बीलाचं असे म्हणाले असता मी हाव किती दयावं लागतील असे म्हणालो. त्यावर यन्नावार देऊन बघ घेतीन त ठिक हे नही तर राहु दे, तु आता आणले का पैसे असे म्हणाले असता मी नाही नाही असे म्हणालो. त्यानंतर पुन्हा माझी व वरिष्ठ लिपिक यन्नावार यांची आपसात कामा संबंधी बरीच चर्चा झाली. त्यानंतर वरिष्ठ लिपिक यन्नावार मालकाला काय म्हणावं, एक बील झाली त्याची फोटो पाठवुन दे तुला पाठवलय म्हणावं दुसऱ्या बिलाच्या आम्ही प्रयत्नामधी म्हणावं थोडसा खर्च लागते तेवढा पाठवुन दे म्हणावं पैसे असे म्हणाले असता त्यावर मी हम्म किती अंदाजे असे म्हणालो. त्यावर वरिष्ठ लिपिक यन्नावार साहेबाला पाच देऊ, मला तीन दे, मला तीन दे साहेबाला पाच देऊ, आठ मागुन घे, दिल घेतलं त ठिक नाही त पाच वापस घेऊन जायचे, आम्हाला काय करायचं, ते आडीला यायला, त्याला म्हणतो पाच घेऊन करुन टाका असे म्हणाले असता त्यावर हम्म, चालन ना ठिक हे, तुम्ही तस बोला तुम्ही असे म्हणालो. त्यावर वरिष्ठ लिपिक यन्नावार तु पैसे मागुन घे असे म्हणाले असता त्यावर मी पैसे देवु पैशाची काही अडचण नाही तुम्हाला माहीत हे आमचे पैसे कुठ जाते का असे म्हणालो. त्यावर वरिष्ठ लिपिक यन्नावार तस नाही हे ते नगदीचा कार्यक्रम हे असे म्हणाले असता त्यावर आमचं बाकीच्या लोकां सारखं काम नाही तुम्हाला माहीत असे म्हणालो. त्यावर वरिष्ठ लिपिक यन्नावार तु जोड लाव बोलुन त्याला संध्याकाळ पर्यन्त करुन टाकु तेवढं असे म्हणाले असता मी जोड लावतो मी काही अडचण नाही असे म्हणालो. त्यावर मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही तेथुन निघुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर मशीन पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केली. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी ऐकले. त्यामध्ये वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग परतुर यांना भाडे तत्वावर दिलेली महिंन्द्रा कंपनीची बोलेरो जिप क्रमांक MH 46 P 8184 चे दोन बील मंजुर करण्यासाठी साहेबांचे 5000/-रुपये व स्वत: चे 3000/-रुपये असे एकुण 8000/-रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम दिनांक 03.02.2025 रोजी संध्याकाळ पर्यत स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबतचा सापळा पथकाने तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा केला.

त्यावरुन दिनांक 03.02.2025 रोजी वरिष्ठ लिपिक यन्नावार यांचे विरुध्द महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे सापळा लावण्याचे ठरविले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांचे सूचने वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयातील त्यांच्या कक्षात पोलीस अंमलदार श्री.जुंबड यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 04.02.2025.

मी धर्मा मदनराव मोटारकर वय 34 वर्ष व्यवसाय चालक रा.घेटोळी ता.जि.जालना मो.नं.9511484111 ईमेल आयडी-dharmarajmotakar19@gmail.com.

समक्ष ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक 03.02.2025 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी आई वडिलांसह राहत असुन मित्र नामे गणेश गंगाधर शेळके रा.परतुर यांच्या महिंन्द्रा कंपनीची बोलेरो जिप क्रमांक MH 46 P 8184 यावर चालक म्हणुन सन 2018 पासुन काम करतो.

सन 2023 मध्ये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना यांनी चारचाकी वाहन भाडयाने चालविण्यासाठी टेंडर काढले होते. तेंव्हा माझा मित्र नामे गणेश गंगाधर शेळके रा.परतुर याने त्याची महिंन्द्रा कंपनीची बोलेरो जिप क्रमांक MH 46 P 8184 ही उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग परतुर येथे भाडे तत्वावर दिली होती. भाडे तत्वावर दिलेली गाडी मी चालवित असल्याने संपुर्ण मालकी व अधिकार हे मला माझा मित्र गणेश शेळके याने बॉण्डवर अधिकारपत्र दिलेले आहे. भाडे तत्वावर दिलेली आमच्या गाडीचे टेंडर हे माहे 09/2024 पासुन संपुष्टात आल्याने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना यांनी आमची गाडी 02 महिने वापरण्यासाठी मुदतवाढ दिलेली आहे.

मी चालवित असलेल्या गाडीचे माहे 09/2024, 10/2024 व 11/2024 या महिन्याचे बील तयार करुन उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग परतुर येथे सादर केले होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग परतुर यांनी सदरचे तीनही बीले हे मंजुरी करीता कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे सादर केले आहे.

मी दिनांक 29.01.2024 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे येऊन तेथील वरिष्ठ लिपिक अमोल यन्नावार यांना भेटुन वर नमुद 1,25,000/-रुपयाचे तीन बील मंजुर करण्याबाबत विनंती केली. त्यावेळी वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी सदरचे बील मंजुर करण्यासाठी साहेबांचे 5000/-रुपये व माझे 3000/-रुपये असे एकुण 8000/-रुपये दयावे लागेल, तरच तुमचे बील मंजुर होईल असे म्हणाले असता मी त्यांना नाईलाजाने होकार दिला. मला वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना लाच दिली नाही तर ते मी चालवित असलेल्या गाडीचे तीन बील मंजुर करणार नाही. वरिष्ठ लिपिक यन्नावार हे मागणी करीत असलेले पैसे हे लाच असल्याचे मला माहिती असल्याने मी आज रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी आलो आहे.

मी आज दिनांक 03.02.2024 रोजी वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे जावुन भेटणार असुन त्यांना माझ्या कामाबाबत बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी माझ्या कडे लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. त्यावर मी, पंचानी व पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी सह्या केल्या.

मी वरिष्ठ लिपिक यन्नावार यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? ते माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकास पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांनी सुचना देवुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर, दोन्ही पंचाचे व माझे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर मशीन एका कापडी पिशवीत टाकुन

बॅटरीची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या स्वकष्टांचे पाचशे रुपये दराच्या 16 नोटा एकुण 8,000/- रुपये रक्कमेला अॅन्थ्रासीन पावडर लावली. सदरील अॅन्थ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे उजव्या खिशात ठेवल्या. पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी लाच स्विकारल्या नंतर त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर येऊन डाव्या हाताने उजव्या हाताची शर्टाची बाही वर करुन इशारा करणे बाबत मला सुचना दिली. तसेच सापळा पथकास त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार श्री.जुंबड यांना सापळा पथकातुन वगळुन कार्यालयातच राहण्याची सुचना दिली. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर सापळापुर्व पंचनामा केला.
त्यानंतर पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. मला व पंच क्र.1 नागरे यांना वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना भेटण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे पाठविले. मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही माझ्या मोटार सायकलने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना कार्यालयाच्या आवारात जावुन थांबलो. त्यावेळी माझ्या पाठीमागे पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 गेडाम यांचे सह खाजगी वाहनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना कार्यालयाच्या जवळ आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने कार्यालयाच्या आजु बाजुला सापळा लावून थांबले.
त्यानंतर मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही पायी चालत कार्यालयात जावुन वरिष्ठ लिपिक यन्नावार यांची भेट घेतली. त्याठिकाणी आमची कामा संबधी बरीच चर्चा झाली. आमच्या चर्चा दरम्यान वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी इथे नको असे म्हणुन ईशाऱ्याने कार्यालयाच्या बाहेर जावुन थांबण्यास सांगितले. त्यामुळे मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही कार्यालयाच्या बाहेर येऊन थांबलो. त्यानंतर थोडया वेळाने वरिष्ठ लिपिक यन्नावार हे बाहेर आल्याने आम्ही बोलत बोलत कार्यालयाच्या आवारात फिरत असतांना पंच क्र.1 नागरे यांचे समक्ष मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या उजव्या खिश्यातुन अॅन्थ्रासिन पावडर लावलेले 8,000/- रुपये काढुन वरिष्ठ लिपिक यन्नावार हयां

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
sidharth jabaji mane(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)
पोलीस ठाणे अमलदार
कदीम जालना
**Name** (नाव): sidharth jabaji mane
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**फिर्याद** दिनांक 04.02.2025.

**मी धर्मा मदनराव मोटारकर वय 34 वर्ष व्यवसाय चालक रा.घेटोळी ता.जि.जालना मो.नं.9511484111 ईमेल आयडी-dharmarajmotakar19@gmail.com.**

समक्ष अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक 03.02.2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी आई वडिलांसह राहत असुन मित्र नामे गणेश गंगाधर शेळके रा.परतुर यांच्या महिंन्द्रा कंपनीची बोलेरो जिप क्रमांक MH 46 P 8184 यावर चालक म्हणुन सन 2018 पासुन काम करतो.

सन 2023 मध्ये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना यांनी चारचाकी वाहन भाडयाने चालविण्यासाठी टेंडर काढले होते. तेंव्हा माझा मित्र नामे गणेश गंगाधर शेळके रा.परतुर याने त्याची महिंन्द्रा कंपनीची बोलेरो जिप क्रमांक MH 46 P 8184 ही उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग परतुर येथे भाडे तत्वावर दिली होती. भाडे तत्वावर दिलेली गाडी मी चालवित असल्याने संपुर्ण मालकी व अधिकार हे मला माझा मित्र गणेश शेळके याने बॉण्डवर अधिकारपत्र दिलेले आहे. भाडे तत्वावर दिलेली आमच्या गाडीचे टेंडर हे माहे 09/2024 पासुन संपुष्टात आल्याने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना यांनी आमची गाडी 02 महिने वापरण्यासाठी मुदतवाढ दिलेली आहे.

मी चालवित असलेल्या गाडीचे माहे 09/2024, 10/2024 व 11/2024 या महिन्याचे बील तयार करुन उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग परतुर येथे सादर केले होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग परतुर यांनी सदरचे तीनही बीले हे मंजुरी करीता कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे सादर केले आहे.

मी दिनांक 29.01.2024 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे येऊन तेथील वरिष्ठ लिपिक अमोल यन्नावार यांना भेटुन वर नमुद 1,25,000/-रुपयाचे तीन बील मंजुर करण्याबाबत विनंती केली. त्यावेळी वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी सदरचे बील मंजुर करण्यासाठी साहेबांचे 5000/-रुपये व माझे 3000/-रुपये असे एकुण 8000/-रुपये दयावे लागेल, तरच तुमचे बील मंजुर होईल असे म्हणाले असता मी त्यांना नाईलाजाने होकार दिला.

मला वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना लाच दिली नाही तर ते मी चालवित असलेल्या गाडीचे तीन बील मंजुर करणार नाही. वरिष्ठ लिपिक यन्नावार हे मागणी करीत असलेले पैसे हे लाच असल्याचे मला माहिती असल्याने मी आज रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी आलो आहे.

मी आज दिनांक 03.02.2024 रोजी वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे जावुन भेटणार असुन त्यांना माझ्या कामाबाबत बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी माझ्या कडे लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. त्यावर मी, पंचानी व पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी सह्या केल्या.

मी वरिष्ठ लिपिक यन्नावार यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? ते माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकास पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांनी सुचना देवुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर, दोन्ही पंचाचे व माझे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर मशीन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 नागरे यांचे सोबत वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना भेटण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही माझ्या कडील मोटार सायकलने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे जावुन वरिष्ठ लिपिक यन्नावार यांची भेट घेऊन कामा बाबत चर्चा केली. त्यानंतर मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही वरिष्ठ लिपिक यन्नावार यांच्या सोबत कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण यांच्या कक्षात गेलो. सदर कक्षात माझ्या कामा बाबत बरीच चर्चा झाली. चर्चे दरम्यान कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण यांनी माझे एक बील मंजुर केले असुन एक बील मंजुरीसाठी सर्कल ऑफीसला पाठविल्याचे सांगितले तसेच एक बील एक दोन दिवसात काढुन देतो असे सांगितले. त्यानंतर कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण यांच्या कक्षात माझ्या कामा संबंधी बरीच चर्चा झाली. त्यानंतर थोडया वेळाने मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही तेथुन निघुन अॅन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर मशीन पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केली. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी ऐकले. त्यामध्ये वरिष्ठ लिपिक यन्नावार व कार्यकारी अभियंता श्री.चव्हाण यांनी तीन बीलापैकी एक बील मंजुर करुन एक बील मंजुरी करीता सर्कल ऑफीसला पाठवल्याचे सांगुन एक बील एक दोन दिवसात काढुन देतो असे निष्पन्न झाले.

त्यानंतर लगेच माझा मोबाईल क्रमांक 9511484111 यावर वरिष्ठ लिपिक यन्नावार यांचा मोबाईल क्रमांक 8237420394 यावरुन कॉल आला. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांच्या सूचना वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु केली. त्यावेळी मी माझ्या मोबाईलचा आवाज स्पिकरवर टाकुन बोललो असता मला वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी पुन्हा भेटण्यास बोलावुन कॉल कट केला असता पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन बंद केली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 नागरे यांचे सोबत पुन्हा वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना भेटण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही माझ्या कडील मोटार सायकलने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे जावुन वरिष्ठ लिपिक यन्नावार यांची भेट घेतली. त्याठिकाणी आमची कामा संबधी बरीच चर्चा झाली. त्यावेळी वरिष्ठ लिपिक यन्नावार हे त्याच काय ते मी बोलतो साहेबाला असे म्हणाले असता मी हम्म असे म्हणालो. त्यावर यन्नावार बोलतो बीलाचं असे म्हणाले असता मी हाव किती दयावं लागतील असे म्हणालो. त्यावर यन्नावार देऊन बघ घेतीन त ठिक हे नही तर राहु दे, तु आता **आणले का पैसे** असे म्हणाले असता मी नाही नाही असे म्हणालो. त्यानंतर पुन्हा माझी व वरिष्ठ लिपिक यन्नावार यांची आपसात कामा संबंधी बरीच चर्चा झाली. त्यानंतर वरिष्ठ लिपिक यन्नावार मालकाला काय म्हणावं, एक बील झाली त्याची फोटो पाठवुन दे तुला पाठवलय म्हणावं दुसऱ्या बिलाच्या आम्ही प्रयत्नामधी म्हणावं **थोडसा खर्च लागते** तेवढा पाठवुन दे म्हणावं पैसे असे म्हणाले असता त्यावर मी **हम्म किती अंदाजे** असे म्हणालो. त्यावर वरिष्ठ लिपिक यन्नावार **साहेबाला पाच देऊ, मला तीन दे, मला तीन दे साहेबाला पाच देऊ, आठ मागुन घे**, दिल घेतलं त ठिक नाही त पाच वापस घेऊन जायचे, आम्हाला काय करायचं, ते आडीला यायला, **त्याला म्हणतो पाच घेऊन करुन टाका** असे म्हणाले असता त्यावर हम्म, चालन ना ठिक हे, तुम्ही तस बोला तुम्ही असे म्हणालो. त्यावर वरिष्ठ लिपिक यन्नावार तु पैसे मागुन घे असे म्हणाले असता त्यावर मी पैसे देवु पैशाची काही अडचण नाही तुम्हाला माहीत हे आमचे पैसे कुठ जाते का असे म्हणालो. त्यावर वरिष्ठ लिपिक यन्नावार तस नाही हे ते नगदीचा कार्यक्रम हे असे म्हणाले असता त्यावर आमचं बाकीच्या लोकां सारखं काम नाही तुम्हाला माहीत असे म्हणालो. त्यावर वरिष्ठ लिपिक यन्नावार तु जोड लाव बोलुन त्याला संध्याकाळ पर्यन्त करुन टाकु तेवढं असे म्हणाले असता मी जोड लावतो मी काही अडचण नाही असे म्हणालो. त्यावर मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही तेथुन निघुन अॅन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर मशीन पोलीस उपअधीक्षक

श्री.जाधवर यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केली. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी ऐकले. त्यामध्ये वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग परतुर यांना भाडे तत्वावर दिलेली महिंन्द्रा कंपनीची बोलेरो जिप क्रमांक MH 46 P 8184 चे दोन बील मंजुर करण्यासाठी साहेबांचे 5000/-रुपये व स्वत: चे 3000/-रुपये असे एकुण 8000/-रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम दिनांक 03.02.2025 रोजी संध्याकाळ पर्यत स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबतचा सापळा पथकाने तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा केला.

त्यावरुन दिनांक 03.02.2025 रोजी वरिष्ठ लिपिक यन्नावार यांचे विरुध्द महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे सापळा लावण्याचे ठरविले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांचे सूचने वरुन अँन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयातील त्यांच्या कक्षात पोलीस अंमलदार श्री.जुंबड यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट बॅटरीची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या स्वकष्टांचे पाचशे रुपये दराच्या 16 नोटा एकुण 8,000/- रुपये रक्कमेला अँन्थ्रासीन पावडर लावली. सदरील अँन्थ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे उजव्या खिशात ठेवल्या. पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी लाच स्विकारल्या नंतर त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर येऊन डाव्या हाताने उजव्या हाताची शर्टाची बाही वर करुन इशारा करणे बाबत मला सुचना दिली. तसेच सापळा पथकास त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार श्री.जुंबड यांना सापळा पथकातुन वगळुन कार्यालयातच राहण्याची सुचना दिली. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर सापळापुर्व पंचनामा केला.

त्यानंतर पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. मला व पंच क्र.1 नागरे यांना वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना भेटण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना येथे पाठविले. मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही माझ्या मोटार सायकलने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना कार्यालयाच्या आवारात जावुन थांबलो. त्यावेळी माझ्या पाठीमागे पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 गेडाम यांचे सह खाजगी वाहनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना कार्यालयाच्या जवळ आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने कार्यालयाच्या आजु बाजुला सापळा लावून थांबले.

त्यानंतर मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही पायी चालत कार्यालयात जावुन वरिष्ठ लिपिक यन्नावार यांची भेट घेतली. त्याठिकाणी आमची कामा संबधी बरीच चर्चा झाली. आमच्या चर्चा दरम्यान वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी इथे नको असे म्हणुन ईशाऱ्याने कार्यालयाच्या बाहेर जावुन थांबण्यास सांगितले. त्यामुळे मी व पंच क्र.1 नागरे असे आम्ही कार्यालयाच्या बाहेर येऊन थांबलो. त्यानंतर थोडया वेळाने वरिष्ठ लिपिक यन्नावार हे बाहेर आल्याने आम्ही बोलत बोलत कार्यालयाच्या आवारात फिरत असतांना पंच क्र.1 नागरे यांचे समक्ष मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या उजव्या खिश्यातुन अँन्थ्रासिन पावडर लावलेले 8,000/- रुपये काढुन वरिष्ठ लिपिक यन्नावार हयांचे समोर घरले असता त्यांनी **किती हे ते** असे म्हणाले असता मी **आठ, साहेबांचे पाच, तुमचे तीन** असे म्हणालो असता वरिष्ठ लिपिक यन्नावार यांनी **बरं** असे म्हणुन त्यांच्या उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवली. त्यानंतर पुन्हा आमच्यात कामा संबंधी चर्चा झाली. त्यानंतर थोडया वेळाने मी ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्व नियोजित इशारा केला. ती वेळ अंदाजे सायंकाळी सहा वाजेची होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्रं.2 गेडाम यांचे सह त्या ठिकाणी आले. पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी पंच क्र.1 नागरे यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 नागरे यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमा कडे अंगुली निर्देश करुन हेच वरिष्ठ लिपिक यन्नावार असुन हयांनी तक्रारदार यांच्या कडुन उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवली आहे असे सांगितल्याने वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना पंचा समक्ष लाचेच्या रक्कमेसह जागेवर पकडले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर वरिष्ठ लिपिक यन्नावार हयांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अमोल रमेश यन्नावार वय 47 वर्षे व्यवसाय नोकरी वरिष्ठ लिपिक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना मुळ रा.पोचमा माता मंदीर, इतवारा बाजार, नांदेड ह.मु.श्री.कासारी यांच्या घरी किरायाने, बालाजी मंदीर जवळ, कचेरी रोड जालना असे सांगीतले. त्यावेळी वरिष्ठ लिपिक यन्नावार यांना स्विकारलेली रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांच्या अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवल्याचे सांगितल्याने त्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना कार्यालयातील एका रुम मध्ये नेऊन पंच क्र.2 गेडाम यांनी त्यांच्या पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यामधुन 8,000/- रुपये काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर सदर रुम मधील लाईट खिडक्या बंद करुन काळया कपडयाच्या सहायाने अंधार करुन पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने वरिष्ठ लिपिक यन्नावार यांचे दोन्ही हात, अंगातील पॅन्ट व लाचेच्या नोटा चेक केल्या असता वरिष्ठ लिपिक यन्नावार यांचे उजव्या हाताचे बोटावर, अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर 8,000/- रुपये लाचेची रक्कम पंचा समक्ष जागीच लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आली. तसेच माझे हात व अंगावरील कपडे अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने चेक केले असता माझे उजव्या हाताचे बोटावर व अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुच्या समोरील खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर वरिष्ठ लिपिक यन्नावार यांच्या कडुन माझ्या कामा संबंधीचे कागदपत्र जप्त केले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर, सापळा पथक, दोन्ही पंच, मी व वरिष्ठ लिपिक यन्नावार असे अँन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात आलो. तसा सविस्तर सापळा पथकाने सापळा पंचनामा केला.

तरी दिनांक 03.02.2025 रोजी आलोसे अमोल रमेश यन्नावार वरिष्ठ लिपिक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना यांनी पंच क्र.1 नागरे यांच्या समक्ष तक्रारदार यांची भाडे तत्वावर दिलेली महिंन्द्रा कंपनीची बोलेरो जिप क्रमांक MH 46 P 8184 चे दोन बील मंजुर करण्यासाठी साहेबांचे 5000/-रुपये व स्वत: चे 3000/-रुपये असे एकुण 8000/-रुपये लाचेची मागणी करुन दिनांक 03.02.2025 रोजी 18.02 वाजेच्या सुमारास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना कार्यालयाच्या आवारात स्वत: स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती.

मी दिलेली फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन त्याची प्रिंट काढुन मी वाचुन पाहिली. ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

( बाळु जाधवर )
पोलीस उपअधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो जालना

**ही फिर्याद दिली सही**